# ❃ उपसंहार ❃

# ※ उपसंहार ※

'डॉ.पतंगराव कदम यांचे नेतृत्व एक राजकीय अभ्यास'हा शोधप्रबंध लिहित असताना डॉ.पतंगराव कदम यांनी महाराष्ट्रातील शिक्षण सामाजिक, राजकीय व सहकार क्षेत्रात महत्वाची भूमिका बजावली आहे. हे संशोधनाअंती दिसून आले. नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रात व लोकशाही जिथे प्रस्थापित करण्यात आली आहे तेथे लोकशाही व्यवस्था त्या राष्ट्रातील नेत्याच्या संमोहित व्यक्तिमत्वामुळेच टिकाव धरून आहे. पूर्वीचे राजकीय पुढारी समाजातील विशिष्ट स्तरातून निर्माण होत. आज परिस्थिती बदललेली आहे. नेतृत्व व व्यक्ती हयात फरक करण्यात येतो. राज्याची शक्ती संविधान आणि विधी यानुसार संघटित झालेले आहे. सत्ता ही पदाला प्राप्त झालेली असते, व्यक्तीला नाही अशा या पदाच्या सत्तेचे क्षेत्र व मर्यादा निर्धारित केलेल्या असतात. व्यक्तीची स्वच्छंदपूर्ण सत्ता आज चालू शकत नाही. नेतृत्वातील बदल नियमानुसार होत असतो. नेमणुका तसेच निवडणुका हे या बदलाचे दोन मार्ग आहेत. बळामुळे सत्ता हस्तगत केली जात नाही. पदाच्या सीमा एक प्रकारे मर्यादित झालेल्या असतात. व्यक्तिमत्वाचे स्वरूप या गुणावर आधारित पूर्वीची नेतृत्वाची कल्पना आज अमान्य झालेली आहे. कार्याच्या संदर्भात कार्यभाग पार पाडण्याची क्षमता हे नेतृत्वाचे प्रमुख लक्षण समजले जाते. तसेच नेतृत्वाचे परिस्थितीजन्य स्वरूपही आज मान्य केले जाते. नेत्याची निवड याच आधारावर केली जाते. नेते हे जन्मताच निर्माण होत नाहीत, ते तयार होत असतात. अधिमान्यता हा या नेतृत्वाचा आधार असतो. वेळोवेळी होणाऱ्या निवडणुकानुसार नेतृत्वात बदल पण होऊ शकतो. निरनिराळया राजकीय पक्षांना अशा राजकीय व्यवस्थेत वाव असल्यामुळे विशिष्ट अशा राजकीय पक्षातील लोकांची नेतृत्वासंबंधी मक्तेदारी निर्माण होत नाही. लोकांचा विश्वास व नेत्यांचे कार्य हया आधारावर लोकशाहीप्रणित नेतृत्व निर्माण होते. राजकीय नेतृत्वात वेळोवेळी बदल होत असलेला आपणास पहावयास मिळतो. राजकीय व्यवस्थेच्या तळाशी असलेले नेतृत्व लोकशाहीच्या मार्गाने त्या व्यवस्थेच्या शिखरापर्यंत सहज पोहचू शकते.

अशा प्रकारे वरील सिध्दांतिक मांडणीचा विचार करता डॉ.पतंगराव कदम यांचे राजकीय नेतृत्वाचा विचार केला असता अतिशय संघर्षमय परिस्थितीतून संघर्ष करत राजकीय व्यवस्थेच्या तळाशी असलेले राजकीय नेतृत्व स्वतःच्या कर्तृत्वाने विविध क्षेत्रात केलेल्या कार्यामुळे महाराष्ट्रातील राजकीय व्यवस्थेच्या शिखरापर्यंत पोहचले असल्याचे

संशोधनाअंती दिसून येते. कोणत्याही एका मर्यादित क्षेत्रापुरतेच किंवा स्वतःच्या मतदारसंघापुरतेच मर्यादित कार्य न ठेवता संपूर्ण महाराष्ट्रात विविध क्षेत्रात विविध अंगी कार्य करणारे नेतृत्व म्हणजे डॉ.पतंगराव कदम यांचे नेतृत्व होय. डॉ.पतंगराव कदम यांचा जन्म गरीब शेतकरी कुटुंबात झाला. कोणत्याही व्यक्तीला लाभलेली परिस्थिती त्या व्यक्तीची गुरू असते. रखरखतं ऊन डोक्यावर घेऊन पायाला चटके सोसत सावलीचा आधार शोधत मैला-मैलाचं अंतर रोज पायी जाऊन शिक्षण घेणे हे त्यांच्या वाटयाला आलं. डॉ.पतंगराव कदम यांचा तालुका दुष्काळी म्हणून महाराष्ट्रभर परिचित आहे. आभाळाकडे बघणाऱ्या भकास नजरा त्यांनी सभोवताली पाहिल्या. अज्ञानाचे व दारिद्र्याचे भयाण रूप पतंगरावांनी पाहिले. शाळेपेक्षा गुराच्या मागे जात असलेले मित्र पाहिले या सर्व परिस्थितीचा त्यांच्या मनावर खोलवर परिणाम झाला ही सर्व परिस्थिती बदलली पाहिजे यासाठी मनात जिद्द ठेवली. त्यांच्या आई खूप काटक व कष्टाळू होत्या सर्व मुलांना भरभरून प्रेम दिले त्यांच्यावर उत्तम संस्कार केले त्या नेहमी म्हणत उद्योगाचे घरी लक्ष्मी राहते. आयुष्यात उत्तुंग स्वप्ने पाहण्याचा त्यांचा स्वभाव त्यांच्याकडूनच संक्रमित झाला आहे असे संशोधनाअंती दिसून येते. स्वप्नांना सत्यात उतरविण्यासाठी कष्ट करण्याची प्रेरणा त्यांच्या आईचीच आहे. अशा प्रकारे डॉ.पतंगराव कदम यांच्यावर त्यांच्या आईच्या संस्काराचा प्रभाव मोठया प्रमाणात झाला असल्याचे दिसून येते.

अत्यंत हालाख्याच्या व संघर्षमय परिस्थितीतून प्राथमिक, माध्यमिक व कमवा व शिका योजनेतून उच्च शिक्षण घेतल्यानंतर पुण्यात येऊन हडपसर येथील साधना विद्यालयात अर्धवेळ शिक्षकाची ७० रू.पगारावर नोकरी धरली. डॉ.पतंगराव कदम यांच्या अंगी सर्वोत्कृष्ट गुण म्हणजे भावी काळाची अचूक पावले ओळखणे हा आहे. २१ व्या शतकातील विज्ञानयुगाला सामोरे जायचे असेल तर गणित व इंग्रजी विषय अत्यंत महत्वाचे आहेत म्हणून गणित व इंग्रजी या विषयाच्या परीक्षा घेऊन "मानव ही जात व मानवता हा धर्म विश्वबंधुत्वाच्या पायावर गतिमान शिक्षणातून समाजपरिवर्तन" या ध्येयाने प्रेरीत होऊन पुण्याच्या कसबा पेठेत १० मे १९६४ रोजी भारती विद्यापीठ शिक्षण संस्था स्थापन केली याच वेळेस त्यांनी ठरविले होते की या शिक्षण संस्थेचे विद्यापीठात रूपांतर करायचे या ठिकाणी डॉ.पतंगराव कदम यांच्या ठायी दुर्दम्य इच्छाशक्ती व महत्वकांक्षीपणा हे गुण दिसून येतात याच इच्छेची पूर्तता म्हणून भारत सरकारने विद्यापीठ अनुदान मंडळाच्या शिफारशीवरून एप्रिल १९९६ रोजी भारती विद्यापीठाच्या १२ शैक्षणिक शाखांना अभिमत

विद्यापीठाचा दर्जा दिला. या अभिमत विद्यापीठाचे डॉ.पतंगराव कदम हे तहहयात कुलपती आहेत. त्यांनी शिक्षण शाखा काढताना पारंपारिक धोपट शिक्षणाचा वापर न करता विद्यार्थ्याला स्वतःच्या पायावर उभा राहता येणाऱ्या शिक्षण संस्था काढल्या. प्रत्येक भागातील परिस्थिती तेथील भागाला व विद्यार्थ्याला आवश्यक असणारे शिक्षण, काळानुरूप समाजव्यवस्थेत होत असणारा बदल, बदलत्या समाजाला आवश्यक असणारे शिक्षण देण्याचा प्रयत्न भारती विद्यापीठाने केला आहे. स्वतःच्या मालकीची संपत्ती निर्माण करणारं शिक्षण हे २१ व्या शतकातल्या पुर्वाधाचं काम राहणार आहे. आम्हाला एक रूपायाची झुणका-भाकर नको आहे. आम्हाला आमच्या श्रमातून संपत्ती निर्माण करण्याचं, या संपत्तीवर हक्क सांगणारं शिक्षण हवं आहे. समाजाच्या धारणेसाठी काम करणारा प्रत्येक मनुष्य मग तो शेतकरी, दुकानदार किंवा श्रमिक असेल ही सगळी माणसं संपत्ती निर्माण करणारी झाली पाहिजेत व ही सारी माणसं या संपत्तीची मालक बनली पाहिजेत ही गरज भागविण्याची संधी भारती विद्यापीठाला मिळाली आहे.

भारती विद्यापीठाच्या प्रत्येक शाखेची इमारत हा एक आदर्श नमुना आहे. या संस्थेने संपूर्ण महाराष्ट्रभर याचा आदर्श घालून दिला आहे. येथे असणारा शिक्षक वर्ग हा गुणवत्तापूर्ण आहे. प्रत्येक शाखा ही आधुनिक तांत्रिक ज्ञानाने सर्व सोयी-सुविधायुक्त अशा आहेत. त्यामुळे भारती विद्यापीठ शिक्षण व्यवस्थेत आपला दर्जा टिकवून आहे. अशा प्रकारच्या शाखा फक्त शहरी भागापुरत्याच मर्यादित न ठेवता कराड, कडेगांव, सांगली, सोलापूर यासारख्या निमग्रामीण भागात मेडिकल, इंजिनिअरींग, विधी, व्यवस्थापन, औषधनिर्माण, कला यासारख्या तांत्रिक शिक्षणाची गंगा ग्रामीण भागापर्यंत पोहचविण्याचे कार्य भारती विद्यापीठाने केले. त्यामुळे अनेक ग्रामीण भागातील मुला-मुलींना व्यावसायिक शिक्षणाची संधी देऊन ग्रामीण भागातील लोकांचा दर्जा उंचावला व ग्रामीण क्षेत्राचा विकासही घडवून आणला. जगभरात उदारीकरणाच्या धोरणाला चालना खऱ्या अर्थाने दुसऱ्या महायुध्दानंतर मिळाली विकसित देशामध्ये याचा प्रसार झपाटयाने झाला तेथे मोठया प्रमाणात बदल घडनू आला व जगाच्या बाजारपेठा त्यांनी काबीज केल्या परंतु भारतासारख्या दुसऱ्या महायुध्दानंतर स्वतंत्र झालेल्या देशात १९९० सालानंतर स्वायत्तीकरण, खाजगीकरण या उदारमतवादी धोरणाचा झपाटयाने प्रसार झाला परंतु हा काळ डॉ.पतंगरावांनी लवकरच ओळखला होता त्याप्रमाणे बदलत्या समाजव्यवस्थेनुरूप शिक्षणव्यवस्थेची रचना केली. त्यामुळे अलिकडील नवीन उच्च शिक्षण क्षेत्रातील नॅक पध्दतीसाठी भारती विद्यापीठाला या

सर्व बाबींचा फायदा होणार आहे अशा प्रकारे डॉ.पतंगराव कदम यांनी प्रत्येक धोरण स्विकारण्यामागे दूरदृष्टी ठेवून ते स्वीकारले आहे. अलिकडील स्वायत्तकरण व खाजगीकरण यासारख्या धोरणांना डॉ.पतंगराव कदम यांचेसारखे तळातून शिखरापर्यंत पोहचलेल्या नेतृत्वाला ग्रामीण भाग व शहरीभागाची जाण असल्यामुळे त्या लोकांच्या समस्या त्यांचे उपाय माहीत असल्यामुळे आधुनिक समाजव्यवस्थेला चांगला फायदा होणार आहे.

अशा प्रकारे भारती विद्यापीठ या संस्थेचे कार्य व यश अजून समाजापुढे नीट स्वरूपात आलेले नाही. हे कार्य महाराष्ट्रातील मराठी माणसासमोर यावे, भारती विद्यापीठाची व्यवस्थापन पध्दती, त्याला डॉ.पतंगराव कदम यांचे लाभलेले नेतृत्व हा एक अभ्यास करण्यासारखा आदर्श नमुना आहे. डॉ.पतंगराव कदम यांनी स्वतः जवळील व्यवस्थापन कौशल्याने शून्यातून विश्व निर्माण केले आहे. कोणताही माणूस जीवनात आणि व्यवसायात यशस्वी कसा होतो हे शोधून काढणे कठीण आहे परंतु त्यांच्या यशाचे रहस्य सापडणे तितकेच आवश्यक आहे. आजपर्यंत जे जे उदयोगपती, व्यापारी, राजकीय नेते आपल्या क्षेत्रात यशस्वी झाले या सर्वांच्या यशाचा विचार केल्यास असे आढळते की त्यातील बहुसंख्य लोकांनी व्यवस्थापन परिणामकारकपणे कसे करावे याचा काळजीपूर्वक विचार केला आहे. कोणताही माणूस एका रात्रीत मोठा होत नाही. आपल्या उद्दिष्टांविषयी स्वच्छ विचार, कामातील सातत्य जिवापाड कष्ट, तर्कशुध्द विचारसरणी अचूकपणे गोळा केलेल्या माहितीचे विश्लेषण, काही निर्णय घेताना पत्करलेली जबाबदारी, काही प्रमाणात पत्करलेला धोका, निर्णयाचे बरे-वाईट परिणामास तोंड देण्याची तयारी इत्यादी गुणामुळे काही व्यक्ती यशस्वी होतात हा विचार डॉ.पतंगराव कदम यांनी अवलंबला आहे.

डॉ.पतंगराव कदम यांनी फक्त आपल्या मतदार संघापुरतेच सामाजिक कार्य न करता संपूर्ण महाराष्ट्रभर सामाजिक कार्य विविध क्षेत्रात केले आहे. पंढरपूर ही देशाची दक्षिण काशी म्हणून प्रसिध्द आहे तेथे सर्व देशभरातून आषाढी व कार्तिकेला लोक येतात त्यांची राहण्याची सोय व्हावी म्हणून त्यासाठी श्रीमती बयाबाई कदम महिला निवास व श्रीपतराव कदम यात्री भवन बांधले आहे. ग्रामीण साहित्यिकांचे संमेलन भरविण्याची प्रथा भारती विद्यापीठाने १९७८ पासून सुरू केली. विचार-भारती हे मासिक ग्रामीण साहित्यिकांचे व्यासपीठ बनले आहे. ग्रामीण साहित्यिकांना त्याचे विचार मांडण्याची संधी भारती विद्यापीठाने उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे ग्रामीण साहित्यिकांच्या साहित्याला

निश्चित स्थान प्राप्त होण्यास मदत होईल. म्हसवड या ठिकाणी दरवर्षी सिध्दनाथाची यात्रा भरते. भाविकांना पाऊस ऊन-वारा यापासून संरक्षण मिळावे म्हणून तेथे श्रीपतराव कदम स्मृती हॉल भाविकांच्या सोयीसाठी बांधला आहे. ग्रामीण भागात शिक्षणप्रसाराचे काम करणाऱ्या आर्थिक दृष्टया मागास शैक्षणिक संस्थांना बंधुत्वाच्या भावनेतून आर्थिक मदत केली आहे. याचे उदाहरण म्हणून रयत शिक्षण संस्थेचे शिरवळ (सातारा) येथील कॉलेजचे उदाहरण सांगता येईल. तसेच रामानंदनगर, शिरसगांव, कडेगांव, तडसर, वांगी, बलवडी, कुंडल, दुधोंडी, खेराडी-वांगी, रामापूर या भागातील शैक्षणिक संस्थांना या भागाचा शैक्षणिक विकास व्हावा म्हणून आर्थिक मदत केली आहे. वृध्द वयामध्ये साहित्यिकांची अवहेलना होऊ नये म्हणून पद्मश्री कवी सुधांशू यांना त्यांच्या वाङ्मयीन आणि सामाजिक कार्यासाठी तहहयात मानधन सुरू केले. तसेच 'जिवाचा सखा' या चित्रपटाचे कथालेखक ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक म.भा.भोसले, विनोदी कलाकार वसंत शिंदे, ज्येष्ठ साहित्यिक शंकरराव खरात यांना मानधन सुरू केले आहे. भारती विद्यापीठ संस्थेने विद्यार्थी कल्याण विभाग सुरू केला आहे. संस्थेत शिक्षण घेणारे काही विद्यार्थी गरीब व होतकरू आहेत. त्यांच्याकरता 'कमवा व शिका' अशी योजना तयार केलेली आहे.

शैक्षणिक क्षेत्रातील अद्वितीय कामगिरीनंतर पुणे परिसरातील व पुणे जिल्हयातील दक्षिण भागातील ग्रामीण जनतेसाठी आरोग्य सेवेसाठी सर्व सुविधांनी युक्त असे हॉस्पिटल नव्हते. सामान्य व गरीब माणसांना माफक दरामध्ये त्यांच्या आरोग्याची व्यवस्थीत काळजी घेता यावी. पुण्यासारख्या शहरात खाजगी हॉस्पिटलची फी सामान्य जनतेला परवडत नाही. पैसा नाही म्हणून एखादयाला प्राण गमवावा लागतो. सामान्य माणसाला अल्प फीमध्ये एखादया रोगावर उपचार करता यावा म्हणून सर्व सुविधांनी युक्त असे भारती हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटरची स्थापना केली आहे. तसेच शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील क्रीडा संकुल वगळता सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर जिल्हयातील ग्रामीण भागाच्या ठिकाणी कोठेही सर्व सुविधांनी युक्त असे भव्य क्रीडा संकुल नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील खेळाडूंच्या क्रीडा गुणांना गुणवत्ता असूनदेखील संधी प्राप्त होत नाही व ग्रामीण भागातील विद्यार्थी खेळात पाठीमागे राहतात. म्हणून सातारा जिल्हयातील ग्रामीण विद्यार्थ्यांची ही अडचण लक्षात घेऊन कराडसारख्या सातारा जिल्हयातील मध्यवर्ती ठिकाणी सद्‌गुरू गाडगे महाराज महाविद्यालयात कै.अभिजित पतंगराव कदम क्रीडा संकुल डॉ.पतंगराव कदम यांच्या सहकार्याने साकारत आहे. विविध क्षेत्रात असामान्य कार्य

करणाऱ्या व्यक्ती समाजास दीपस्तंभाप्रमाणे प्रकाश देतात. अशा गुणवंत व्यक्तीचा आदर्श नवीन पिढीसमोर सतत तेवत राहावा तसेच थोर गुणवंत व्यक्तीच्या सेवाभावी कार्याचा गुणगौरव व्हावा या उद्देशाने भारती विद्यापीठामार्फत पुरस्कार देऊन गौरव करण्याची प्रथा सुरू केली आहे.

अशा प्रकारे भारतामध्ये काही समाज हा अतिश्रीमंत समाज आहे. त्यांना पैशावरती टॅक्स द्यावा लागतो तर दुसरीकडे असा समाज आहे की ज्याला दोनवेळच्या जेवणासाठी संघर्ष करावा लागतो. जर ही परिस्थिती बदलावयाची असेल तर श्रीमंत लोकांनी सामाजिक बांधिलकीतून गरीब समाजाची जबाबदारी उचलली पाहिजे अशाच प्रकारे डॉ.पतंगराव कदम यांनी त्यांच्यापरीने त्यांच्या मतदार संघात, जिल्हयात व महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी सामाजिक कार्य केले आहे.

आधुनिक काळात यशस्वी नेतृत्वाबाबत जी अनेक संशोधने झाली आहेत त्यांचे काही निष्कर्ष नियमरूपाने सांगता येणे शक्य आहे. समूहाला असे वाटले पाहिजे की नेता हा आपल्यापैकीच एक आहे. बाहेरचा नाही त्यासाठी नेत्याची मूल्ये व अभिवृत्ती आणि समूहाची मूल्ये व अभिवृत्ती यामध्ये फार तफावत नसावी. असल्यास नेतृत्वास ओहोटी लागते. म्हणूनच यशस्वी नेते समूहात मिसळतात व त्यांच्या जीवनात सहभागी होत असल्याचे दाखवीत असतात पण त्याबरोबरच अनुयायांना असेही वाटले पाहिजे की आपल्याला इष्ट वाटणारे गुण नेतृत्व करणाऱ्याच्या ठिकाणी अधिक प्रमाणात आहेत आपल्यापैकीच उत्तम पण बुध्दी, ज्ञान, कर्तबगारी इ.बाबतीत आपल्यापैकी उत्तम व्यक्ती असे नेत्याविषयी अनुयायांना वाटले पाहिजे.

डॉ.पतंगराव कदम १९६८ सालापासून राजकारणात सक्रीय आहेत. तत्कालीन कालखंडापासून ते काँग्रेसपक्षाशी एकनिष्ठ राहिले आहेत. राजकारणात अनेक वादळे आली अनेक नवीन पक्ष स्थापन झाले. परंतु काँग्रेसपक्षावरील निष्ठा कधीही ढळू दिली नाही. पक्ष वाढविण्यासाठी सतत जागृत राहिले. डॉ.पतंगराव कदम यांचा विचार असा की विधायक कामाला मदत आणि विध्वंसक प्रवृत्तींना विरोध या दृष्टीने राजकारण केले जे योग्य आहे जे समाज हिताचे आहे त्या गोष्टी स्वीकारल्या, ज्या गोष्टी पटल्या नाहीत त्याला स्पष्टपणे विरोध केला अशा निर्णयासंबंधी कधी तडजोड केली नाही. त्यांना अन्यायाबद्दल संताप आहे. म्हणूनच राजकारण, समाजकारण, शिक्षण व सहकार क्षेत्रात

संघर्ष करीत त्यांनी आपली वाटचाल सुरू ठेवली आहे. डॉ.पतंगराव कदम स्पष्टवक्ते आहेत ते अन्यायाविरोधी स्पष्ट बोलतात. त्या ठिकाणी ते कशाचीही परवा करीत नाहीत. सार्वजनिक आणि व्यक्तिगत आयुष्यात डॉ.पतंगरावांना विविध आव्हानांना सामोरे जावे लागले. राजकीय आघाडीवर निवडणुका ही लोकशाही अंतर्गत अपरिहार्य बाब असते. अनेक लहान-मोठया निवडणुका ते स्वतः लढले. गावातील सोसायटी असो किंवा पक्षातील एखादी निवडणूक असो त्यांना भलेबुरे अनुभव आले परंतु त्यांच्या बाबतीत ते पराभवाच्या घटने पाठोपाट ते दुप्पट वेगाने विजयी होत गेल्याचे दिसते. डॉ.पतंगराव कदम यांचा विचार असा की तुमचा तुमच्यावर विश्वास पाहिजे, कष्ट करण्याची तयारी पाहिजे प्रसंगी चणे खाऊ न ध्येयप्राप्त करण्याची जिद्द पाहिजे तरच तुम्हाला यश मिळेल. यश हे दैवाधीन नाही माणसे फार आळशी असतात त्यांना कष्टाशिवाय संपत्ती हवी असते. विद्वतेशिवाय मान हवा असतो व संघटनेशिवाय पद हवे असते.

महाराष्ट्राच्या स्थानिक नेतृत्वाचा विचार केला असता महाराष्ट्र स्थापनेच्या अगोदर जी नेतृत्व तयार झाली ती नेतृत्व भारती स्वातंत्र्यचळवळीतून व संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतून तयार झाल्याचे दिसते. याचे उदाहरण म्हणून अनेक नेतृत्वाचा उल्लेख करता येईल उदा.यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, क्रांतीसिंह नाना पाटील, नागनाथ (अण्णा) नायकवडी, शंकरराव मोरे, केशवराव जेधे, शंकरराव मोहिते-पाटील,क्रांतिअग्रणी जे.डी.(बापू) लाड, किसन वीर, तुळशीदास जाधव, यशवंतराव मोहिते, राजारामबापू पाटील, भाई एन.डी.पाटील, भाई गणपतराव देशमुख, बाळासाहेब देसाई इत्यादी अनेक नेतृत्व तत्कालीन कालखंडात विविध चळवळीतून उदयाला आली तर महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर आधुनिक महाराष्ट्राच्या राजकारणात ग्रामीण नेतृत्व तीन प्रकारातून उदयाला आल्याचे संशोधनाअंती दिसून येते.

(१) महाराष्ट्र ही सहकार क्षेत्राची पंढरी म्हणून ओळखली जाते. सहकारातून वर आलेले नेतृत्व म्हणून अनेक उदाहरणे सांगता येतील. उदा.बाळकृष्ण विखे-पाटील, शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे, पी.डी.पाटील, लक्ष्मणराव पाटील, जयंत पाटील, विनय कोरे इत्यादी अशी अनेक नेतृत्व महाराष्ट्रात सहकारातून राजकारणात आली असल्याची उदाहरणे आहेत.

(२) १९६२ साली महाराष्ट्रात पंचायत राज्य व्यवस्था सुरू झाली यातून महाराष्ट्रात इतर

क्षेत्राच्या तुलनेने सर्वात जास्त ग्रामीण नेतृत्व महाराष्ट्राच्या राजकारणात पुढे आली याचे उदाहरण म्हणून पुढील नेतृत्वांचा उल्लेख करावा लागेल. उदा.विलासराव देशमुख, विजयसिंह मोहिते-पाटील, आर.आर.पाटील, सदाशिवराव मंडलिक, रामराजे नाईक-निंबाळकर, शिवाजीराव नाईक, राजन पाटील इत्यादी अनेक नेतृत्व पंचायतराज्य व्यवस्थेतून राजकारणात आली.

(३) स्वतःच्या कर्तृत्वाने व लोकउपयोगी केलेल्या कार्यातून लोकांची अधिमान्यता मिळवून आधुनिक महाराष्ट्रात काही राजकीय नेतृत्व तयार झाली याचे उदाहरण म्हणून पुढील नेतृत्वांचा उल्लेख करावा लागले. उदा.शरदचंद्रजी पवार, डॉ.पतंगरावजी कदम, डॉ.पद्मसिंह पाटील, अभयसिंहराजे भोसले, दिग्विजय खानविलकर, लक्ष्मणराव ढोबळे इत्यादी अशी अनेक नेतृत्व विविध कार्यातून निवडून येऊन आमदार झाली आपल्या कार्याचा ठसा जनतेवर उमटविला.

सांगली जिल्हयातील भिलवडी-वांगी मतदार संघात अत्यंत संघर्षमय परिस्थितीतून विविध कार्यातून कर्तृत्वाचा डोंगर उभा करणारे राजकीय नेतृत्व म्हणजे डॉ.पतंगराव कदम होय. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना सांगली जिल्हयात व काँग्रेसपक्षात आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर राजकीय नेतृत्व प्रस्थापित केले आहे. डॉ.पतंगराव कदम यांना लहानपणापासूनच सामाजिक व राजकीय कार्याची आवड होती. महाविद्यालयीन विद्यार्थी असल्यापासून ते महाराष्ट्राचे थोर विचारवंत यशवतंराव मोहिते यांच्या विचाराकडे आकर्षित झाले होते. यशवंतराव मोहिते भारती विद्यापीठ संस्थेचे अध्यक्ष झाले त्यावेळेपासून डॉ.पतंगराव कदम व यशवतंराव मोहिते यांचे स्नेह अधिक वाढत गेले. त्यांची काम करण्याची तळमळ व तडफ आत्मविश्वास यशवंतराव मोहिते यांनी जवळून पाहिले. त्यांच्यामध्ये समाजाचे नेतृत्व करण्याचे गुण दिसत. श्री यशवंतराव मोहिते परिवहन खात्याचे १९६७ साली कॅबिनेट मंत्री झाले. तेव्हा डॉ.पतंगराव कदम यांची १९६८ साली महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या सदस्यपदी निवड केली. डॉ.पतंगराव कदम यांच्या राजकीय नेतृत्वाला खूप मोठी संधी प्राप्त करून दिली. त्यावेळेपासून त्यांचे राजकीय नेतृत्व आकार घेऊ लागले. त्यांचा स्थायीभाव मिळालेल्या संधीचे सोने करणे, त्यांनी बोर्ड मेंबर पदाला वेगळे स्थान मिळवून दिले. बोर्ड मेंबर असताना मतदार संघात केलेले कार्य लोकांशी वाढणारा संपर्क, मतदार संघात विविध सहकारी संस्था स्थापन केल्या यामुळे डॉ.पतंगराव

कदम यांची ताकद मतदार संघात वाढत गेली. त्यांच्या ध्येयवादी स्वभावातून व केलेल्या कार्यातून यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, बाळासाहेब देसाई यांचा संपर्क व स्नेह वाढला. तर महाराष्ट्राचे ज्येष्ठ विचारवंत यशवंतराव मोहिते यांनी राजकारणात डॉ.पतंगराव यांना वेळोवेळी सहकार्य केले.

डॉ.पतंगराव कदम १९७२ पासून कॉंग्रेस पक्षाचे तिकीट मिळवण्यास प्रयत्नशील होते परंतु त्यांना तिकीट मिळाले नाही. १९८० सालच्या विधानसभा निवडणुकीत अपक्ष म्हणून उभे राहिले त्यामध्ये त्यांना अपयश आले. परंतु अपयशाने खचून न जाता भिलवडी-वांगी मतदार संघात कार्य चालू ठेवले. १९८५ च्या निवडणुकीत अपक्ष म्हणूनच निवडणूक लढविली. प्रथम आमदार झाले. महाराष्ट्रातील दुष्काळी भागाच्या प्रश्नाबाबत व ताकारी योजनेसाठी महाराष्ट्राच्या विधानभवनात आवाज उठविणारा लोकप्रतिनिधी म्हणून महाराष्ट्रभर परिचित झाले. १९९० च्या निवडणूकीत कॉंग्रेसपक्षाला त्यांच्या कार्याची व कर्तृत्वाची दखल घ्यावी लागली. १९९० च्या निवडणूकीत ते कॉंग्रेस पक्षाच्या तिकीटावर विजयी झाले. १९९१ ते ९५ या कालखंडात उच्च शिक्षण व तंत्रज्ञान खात्याचे मंत्री म्हणून महत्वपूर्ण कामगिरी बजावली. १९९५ व त्यानंतरच्या १९९६ च्या पोटनिवडणुकीत ते पराभूत झाले. परंतु मतदार संघातील कार्यात सातत्य ठेवले. १९९९ च्या निवडणुकीत विजयी होऊन उद्योग, व्यापार व वाणिज्य खात्याचे मंत्री झाले आहेत.

कै.वसंतदादा पाटील हयात असे पर्यंत राष्ट्रीय स्तरापर्यंत सांगली जिल्हयाचे महत्व होते. परंतु वसंतदादा यांचे निधन झाले आणि सर्वप्रथम त्यांच्यानंतर सांगली जिल्हयाचे नेतृत्व कोणी करायचे हा प्रश्न उभा राहिला. मात्र वसंतदादांच्या विचाराने काम करणाने नेतृत्व म्हणजे पतंगराव कदम हे होय हे ठामपणे म्हणावे लागेल. जिल्हापरिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, जिल्हा मध्यवर्ती बँक, जिल्हा कॉंग्रेस कमिटी अथवा विधानसभा निवडणुक असो जिल्हयाच्या नेतृत्वात डॉ.पतंगराव कदम यांनी पुढाकार घेतला सर्व कार्यकर्त्यांना समान संधी मिळाली पाहिजे अशी पंतगराव कदम यांची भूमिका राहिली. त्यासाठी आग्रह धरला आणि संघर्ष केला यामध्ये त्यांना कधी यश आले तर कधी अपयश आले. परंतु यश-अपयश याची परवा न करता महाराष्ट्रात व सांगली जिल्हयात पक्षाचे कार्य सतत कार्यरत ठेवले आहे.

डॉ.पतंगराव कदम यांच्या सहकारी नेतृत्वाबाबत विचार केला असता,

त्यांनी भिलवडी-वांगी मतदारसंघात सहकाराचे जाळे विणले आहे. सहकार विषयी शासनाचे धोरण सर्वत्र सारखेच होते परंतु महाराष्ट्रात सहकार चळवळ भक्कम झाली त्याचे कारण म्हणजे सहकार चळवळीला लाभलेले खंबीर व गतिमान नेतृत्व होय. ही चळवळ महाराष्ट्रात यशस्वी करण्यास नामदार गोखले, वैकुंठभाई मेहता, डॉ.धनंजयराव गाडगीळ, श्री विठ्ठलराव विखे-पाटील, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शंकरराव मोहिते-पाटील, बाळासाहेब देसाई, तात्यासाहेब कोरे, यशवंतराव मोहिते इत्यादी अशा अनेक मातब्बर आणि कार्यक्षम व्यक्तिंच्या नेतृत्वाने आणि मार्गदर्शनामुळे महाराष्ट्रातील सहकारी चळवळ यशस्वी झाली. महाराष्ट्रातील ग्रामीण भागाचा जो कायापालट झाला त्या विकासामध्ये सहकारी क्षेत्राचा सर्वात मोठा वाटा आहे. सहकाराने ग्रामीण भागातील लोकांचे आठराविश्व दारिद्रय नष्ट करून ग्रामीण जनतेचे राहणीमान उंचावले याच विचारांनी प्रेरित होऊन डॉ.पतंगराव कदम यांनी भिलवडी-वांगी मतदार संघात व संपूर्ण महाराष्ट्रभर सहकाराचे क्षेत्र विकसित केले आहे. डॉ.पतंगराव कदम यांचा मतदार संघ हा डोंगराळ व दुष्काळग्रस्त. तेथील जनतेचा शेती हा मुख्य व्यवसाय तीही कोरडवाहू पाऊस पडला तर शेती पिकते अन्यथा प्रचंड दुष्काळ परंतु डॉ.पतंगरावांसारख्या कार्यक्षम व कर्तृत्वान नेतृत्वाने विविध विकास कामातून व सहकाराच्या माध्यमातून तेथे नंदनवन फुलविले आहे.

सर्वसामान्य माणसाला व शेतकरी, शेतमजूराला सावकारी पैशातून मुक्त करता यावे म्हणून १९७१ साली भारती सहकारी बँक पुणे येथे स्थापन केली. तिच्या शाखा मतदार संघात व संपूर्ण महाराष्ट्रभर काढल्या आहेत. ग्रामीण भागातील शेतकऱ्याला शेतीपूरक अवजारे, बिया गावातच उपलब्ध व्हावीत म्हणून १९७३ साली भारती मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार, पुणे येथे काढले व मतदार संघात त्याच्या शाखा काढल्या आहेत. भिलवडी वांगी सारख्या दुष्काळ भागातील जनतेला शेतीला पूरक व्यवसाय व एक किफायतशीर खात्रीलायक जोडधंदा निर्माण करता आला पाहिजे म्हणून १९८७ साली सोनहिरा कुक्कुटपालन व सोनहिरा दूध उत्पादक प्रक्रिया कृषीपूरक उद्योग सहकारी संघ १९९१ साली कडेगांव येथे स्थापन केला. सोनहिरा खोऱ्यातील अकुशल लोकांच्या हाताला काम व सुशिक्षित बेरोजगाराला रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून १९९१ साली सागरेश्वर सहकारी सूतगिरणी कडेगांव (सांगली) येथे स्थापन केली. भिलवडी-वांगी मतदार संघातील बागाईत शेतकऱ्याच्या ऊसाला चांगला दर मिळावा व जिराईत शेतकऱ्याच्या हाताला काम मिळावे म्हणून १९९४ साली सोनहिरा सहकारी साखर कारखाना स्थापन केला आहे. तसेच

संपूर्ण मतदार संघातील शेतकऱ्याला शेतीसाठी वेळोवेळी कर्ज उपलब्ध व्हावीत म्हणून सहकारी तत्वावर विविध पतसंस्था स्थापन केल्या आहेत. या सर्व सहकारी संस्थांचे वैशिष्टय म्हणजे दुष्काळी व डोंगराळ भागात संस्था स्थापन करून सर्व संस्था नफा तत्वावर चालवून संपूर्ण महाराष्ट्रभर आदर्श निर्माण करून दिला आहे. अलिकडील काही पुढाऱ्यांनी जनतेच्या पैशातून सहकारी संस्था स्थापन केल्या आहेत. त्या पुढाऱ्यांना चरण्यासाठी कुरणे म्हणून त्याचा वापर होऊ लागला आहे.

अशा प्रकारे डॉ.पतंगराव कदम यांनी शिक्षण, सामाजिक, राजकीय व सहकार क्षेत्रात व मतदारसंघात व संपूर्ण महाराष्ट्रभर केलेले कार्य त्यातून हजारो अकुशल व सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी उपलब्ध करून दिली या सर्व व्यवस्थेतून डॉ.पतंगराव कदम यांचे नेतृत्व तयार झाल्याचे संशोधनाअंती दिसून येते. एका गरीब कुटुंबात जन्म घेऊन शून्यातून विश्व निर्माण केले आहे. त्यांच्यासारख्या सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या असंख्य होतकरू तरूणांच्या दृष्टीने आदर्श व अनुकरणीय आहे. त्यांनी केलेले कार्य फक्त सांगली जिल्हयापुरते मर्यादित न ठेवता संपूर्ण महाराष्ट्रभर कार्य केले आहे. डॉ.पतंगराव कदम यांचेसारखे कर्तबगार नेतृत्व देशातील प्रत्येक विधानसभा व लोकसभा मतदार संघात निर्माण झाले तर महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू यांना अभिप्रेत असणारा भारत देश निर्माण होईल.

****